DISTRICT AND SESSIONS
COURT, SATARA.
INWARD NO. 4803
DATE - 10/04/2026
REGISTRAR

जावक क्र.३०६४/२०२६
दिवाणी न्यायालय क.स्तर कराड
दिनांक ०९/०४/२०२६

पाहिले व वाचले/संदर्भ - मा.जिल्हा न्यायालय सातारा यांचेकडील जा.क्र. प्रशा/झेरॉक्स/२०२६/२८०९/२०२६, दिनांक ०६/०४/२०२६.

निविदा

मा.दिवाणी न्यायालय क.स्तर, कराड या न्यायालयातील कार्यालयीन झेरॉक्सचे काम बाहय यंत्रणेद्वारे करुन घेणेकरीता झेरॉक्स कंत्राटदार नेमणेकरीता निविदा मागविणेत येत आहेत.

स्थानिक पातळीवरील झेरॉक्स कंत्राटदारांनी त्यांच्या निविदा सिलबंद लखोटयात मा. दिवाणी न्यायालय क.स्तर, कराड यांचे नावे त्यावर बाहययंत्रणेद्वारे झेरॉक्सचे काम करणेकरीता निवीदा असा स्पष्ट उल्लेख करुन त्या दिनांक १८/०४/२०२६ रोजी अगर तत्पुर्वी दिवाणी न्यायालय क.स्तर, कराड येथे सादर कराव्यात.

सिलबंद निविदेवर आपल्या फर्मचे नाव, सविस्तर पत्ता संपर्क क्रमांक याचा स्पष्ट उल्लेख असणे आवश्यक आहे.

१. अत्याधुनिक झेरॉक्स मशीनचा झेरॉक्ससाठी वापर करणे आवश्यक आहे.
२. झेरॉक्ससाठी पेपर कागद ७० किंवा ७५ जीएसएम असणे आवश्यक आहे.
३. झेरॉक्स काढलेबाबतची नोंद नोंदवहीत घेवून त्याप्रमाणे रोजचे रोज झालेल्या कामाबाबत सहा. अधीक्षक यांची स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे.
४. एकुण काढलेल्या झेरॉक्सची बिले सादर केलेनंतर बीलाची रक्कम अदा केली जाईल.
५. निविदा स्विकारण्याचे व नाकारण्याचे सर्व अधिकार दिवाणी न्यायाधिश क.स्तर, कराड यांचे राहतील.

हुकुमावरुन,

सहा.अधिक्षक (वित्त)
दिवाणी न्यायालय क.स्तर, कराड.

प्रत –
१. दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, कराड यांचेकडील नोटीस बोर्डवर प्रसिद्धीसाठी.
२. जिल्हा न्यायालय, सातारा यांचे संकेतस्थळावर प्रसिद्धीसाठी.